# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 129/2022 दिनांक : 29.03.2022

## 1)घरफोडी :—

**वजिराबाद :—**दिनांक 27.03.2022 रोजी चे 18.00 ते दिनांक 28.03.2022 रोजीचे 08.30 वा. चे दरम्यान, **गुरुकृपा बॅटरीचे दुकान खालसा हायस्कुल समोर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी आपले बॅटरी दुकान बंद करुन घरी गेला असता दुकानाचे शेटर मध्यभागी वाकवून आत प्रवेश करुन अमरॉन कंपनीच्या 48 बॅटरी किंमती अंदाजे 4,32,000/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शंकर व्यंकटराव शिंदे, वय 36 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शारदानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 90/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री निलपत्रेवार**, **मो.क्रं. 9881201052** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :—

**1)रामतीर्थ :—**दिनांक 25.03.2022 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी थडीसावळी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस नमुद आरोपीने तु माझ्या बायकोच्या केस मध्ये तिला का मदत केलास व शेती वाहिती साठी तिला का मदत करतोस म्हणुन शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली व काठीने डाव्या हातावर मारुन हात फॅक्चर केला व फिर्यादीचे पत्नी सोडवण्यास आली असता तिला पण मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी व्यंकट माणिक सोळकर, वय 47 वर्षे, व्यवसाय शेती रा. थडीसावळी ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरन 51/2022 कलम 325,324,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/श्री इंगळे, मो. नं. 9765902710** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—**दिनांक 26.03.2022 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर जयभिमनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे मुलीस तु आमचे घरासमोर का खेळते असे म्हणुन तोंडावर बुक्की मारुन समोरील वरचे दोन दात पाडले व शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली व पुन्हा माझ्या समोर आलीस तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी राजेश संतराम ढवळे, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. जयभिमनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 115/2022 कलम 325,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोना/835 बामणे, मो. नं. 8308878094** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :—

**1)हदगाव :—** दिनांक 05.09.2017 पासुन ते आठ महिन्यापुर्वी पर्यंत, **फिर्यादीचे सासरी भालार कॉलनी ता. वणी जि. यवतमाळ ह.मु. संभाजी नगर हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु घर सोडुन जा तुला मुलबाळ होत नाही उपचार करणेसाठी माहेरहुन पैसे घेवून ये असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन मारहाण केली, शारिरीक व मानसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 31 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 106/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2342 हंबर्डे, मो.क्रं. 9284422052** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** जुलै 2010 ते दिनांक 13.02.2022 पर्यंत, **फिर्यादीचे सासरी सिडको,नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस माहेरहुन दोन लाख रुपये घेवून ये असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन मारहाण केली, शारिरीक व मानसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 31 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 185/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2161 शेख जावेद, मो.क्रं. 8999978576** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 22.03.2022 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **मोरे मामा यांचे दुकान समोर कोहीनोर मिल समोर एमआयडीसी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा मयत शुभम मधुकर जाधव वय 25 वर्षे रा. वात्सलनगर सोसायटी सिडको, नांदेड** यास यातील नमुद मोसा क्र. टी.एस./09—ईव्ही—4697 चा चालकाने त्याचे ताब्यातील मो.सा. हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी मधुकर शंकर जाधव वय 62 वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त शिक्षक रा. वात्सलेनगर, सोसायटी सिडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 187/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री केंन्द्रे, मो.क्र. 9422188871** हे करीत आहेत.

## 5)अंमली पदार्थ :–

**मुखेड :–** दिनांक 27.03.2022 रोजी चे 21.45 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराचे बाजुस मोकळया जागेत मौजे चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले राहाते घराचे मोकळया जागेत गांजाचे एक झाड ज्याचे वजन 07 किलो 690 ग्रॅम अंमली पदार्थ गांजा किंमती 38,450/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन दत्ता काळे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 96/2022 कलम 20(ब) एनडीपीएस अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/श्री विलास गोबाडे**, **मो.क्र. 8805957400** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 28.03.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **जुना मोंढा सार्वजनिक रोडवर,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मधुर नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2220/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/2557 शिवानंद बाालाजी हंबर्डे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 59/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/979 माडगे**, **मो.क्र. 9552562557** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 28.03.2022 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **खुदबेनगर चौरस्ता जवळ सार्वजनिक रोडवर,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 3120/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/686 रुपेश गंगाधर दासरवार, ने. स्थागुशा,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 186/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/कदम**, **मो.क्र. 9284351496** हे करीत आहेत.

**3)शिवाजीनगर :–** दिनांक 28.03.2022 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **शिवाजीनगर नवामोंढा गंगाबार जवळ,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1930/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1675 मारोती नारायण तेलंगे, ने. स्थागुशा,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 114/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2753 लियाकत**, **मो.क्र. 9923799345** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड